महाराष्ट्र फाऊंडेशनचा २०१० साहित्य आणि समाजकार्य पुरस्कार सोहळा पुण्यात २६ जानेवारी २०११ ला नेहमीच्या थाटात साधना ट्रस्टच्या आणि बालगंधर्वच्या सभागृहात पार पडला.

महाराष्ट्र फौंडेशनने ह्या वर्षी एक नवा पुरस्कार **"लक्षवेधी प्रशासकीय कार्य"** द्यायला सुरुवात केली आहे. हा पुरस्कारार्थी फक्त स्मृतिचिन्ह देऊन गौरविला जातो कारण प्रशासकीय अधिकाऱ्याला रक्कम देता येत नाही. ह्या वर्षी **लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हा**, ह्यांना "Save The Baby Girl, Save The Nation" अभियान उत्तम तऱ्हेने राबविल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. लक्ष्मीकांत देशमुख म्हणतात की "कुठलेही अभियान राबवताना प्रशासकाने आऊट ऑफ द बॉक्स विचार करण्याची गरज आहे".

**साहित्य जीवनगौरव** पुरस्काराचे मानकरी **अरुण टीकेकर.** "वैचारिक स्वातंत्र्याची मोठी लढाई खेळावी लागणार आहे" हा आहे टीकेकरांचा संदेश.

**विशेष ग्रंथ** पुरस्काराचे मानकरी **सय्यदभाई** मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे काम निष्ठेने पुढे चालवतात. त्यांच्या **दगडावरची पेरणी** ह्या पुस्तकाला पुरस्कार देण्यात आला आहे.

**वैचारिक ग्रंथ** पुरस्काराचे मानकरी **आनंद तेलतुंबडे** ह्यांची पुस्तके त्यांच्या कृतीशीलतेचा भाग आहे असे ते मानतात. **साम्राज्यविरोध आणि जातिविनाश** ह्या त्यांच्या ग्रंथाला पुरस्कार दिला आहे. **तेलतुंबडे** यांचा मूळ ग्रंथ इंग्रजीमध्ये "Anti Imperialism and Annihilation of Castes" हा आहे.

**अपारंपरिक ग्रंथ** पुरस्काराचे मानकरी **वि. ना. श्रीखंडे** हे निष्णात सर्जन असून त्यांच्या **...आणि दोन हात** ह्या पुस्तकाला पुरस्कार दिला आहे. त्यांचे अनुभवकथन अनेकांना प्रेरणादायी ठरेल.

**ललित ग्रंथ** पुरस्काराचे मानकरी **जी. के. ऐनापुरे** ह्यांना **रिबोट** ह्या कादंबरीसाठी गौरविले आहे. कादंबरीच्या कथामूल्यांना धक्का न लावता तिची सामाजिक-आर्थिक-राजकीय अर्थपूर्णता टिकवण्यात लेखक यशस्वी झाला आहे – पुरस्कार समिती

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार आशुतोष पोतदार** ह्यांना **आनंदभोग मॉल** नाटकासाठी मिळाला आहे॰ रफिक सूरज म्हणतात – हे नाटक आशय आणि आविष्कार या दोन्हींनी परिपूर्ण आहे.

**समाजकार्य जीवनगौरव** पुरस्काराचे मानकरी **नागनाथअण्णा नायकवडी** हे १९४२च्या लढ्यापासून आजही सामाजिक न्यायासाठी सातत्याने संघर्ष करीत आहेत. कृतीतून तत्वज्ञान उभे करणारा अशी **नागनाथअण्णांची** ओळख सांगितली जाते.

**समाजकार्य विशेष पुरस्कार** ह्या वर्षी **चंद्रकांत केळकर** ह्यांना देण्यात आला. केळकर म्हणतात की वैचारिक भूमिकेकरिता आवश्यक दृष्टी समाजकार्यानेच दिली. महराष्ट्र फाऊंडेशनच्या पुरस्काराचे संयोजन गोरे स्मारक ट्रस्ट तर्फे केळकरांनी समर्थपणे केले आणि पुरस्कारांना प्रतिष्टा मिळवून दिली.

**कार्यकर्ता: प्रबोधन** पुरस्कार **सत्यपाल महाराज** ह्यांना देण्यात आला आहे. ते म्हणतात "गिरतेको उठाना स्वर्ग मेरा". कीर्तनातून समाज प्रबोधन हे सत्यपाल महाराजांचे विशेष आहे. त्यांच्या प्रवाही कीर्तनाचा अनुभव त्यांच्या भाषणातून मिळाला.

**कार्यकर्ता: असंघटित कष्टकरी** पुरस्कार **बस्तू रेगे** ह्यांना देण्यात आला आहे. संघर्ष आणि विधायक कार्य ह्या दोन्ही क्षेत्रात ते काम करतात. महाराष्ट्र दगडखाण असंघटित कामगार विकास परिषदेची स्थापना ह्यांनी केली.

**कार्यकर्ता: सामाजिक प्रश्न** पुरस्कार **हरिष सदानी** ह्यांनी मिळवला आहे. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ हे हरिशची ओळख "संक्रमणकाळात जिद्दीने काम करणाऱ्या पिढीचा प्रतींनिधी" अशी करून देतात.

**युवा कार्यकर्ता** पुरस्कार **नीलेश निमकर** ह्यांना देण्यात आला आहे. नीलेश "क्वेस्ट" ह्या संस्थेच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यात प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाचे काम करतात.

पुरस्कार समारंभाला प्रसिद्ध शास्त्रज्ञ रघुनाथ माशेळकर  आणि अमोल पालेकर पाहुणे लाभले होते. मा. मोहन धारिया हे अध्यक्ष होते. महाराष्ट्र फाऊंडेशनचे सुनील देशमुख आणि रजनी शेंदुरे, अध्यक्ष आणि पाहुणे ह्यांनी पुरस्कार प्रदान केले.

साधना साप्ताहिकाचा 5 फेब्रुवरी, 2011 अंक हा साहित्य आणि समाजकार्य वेशेषांक म्हणून प्रसारित झाला. अंकात प्रत्येक पुरस्कारार्थींचे मनोगत अँड ओळख, पाहुण्याचे भाषण आणि संपादकीय सर्वच अतिशय वाचनीय आहे.

प्रेक्षकांमध्ये उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे बस्तू रेगे ह्यांच्या दगडखाण कामगारांच्या शाळेतील मुले ह्या कार्यक्रमाला आलेली होती. त्यांनी शाळेत जाण्याला इतके महत्व आहे की त्यांच्या भाऊंना बक्षीस मिळाले हे त्यांना जाणवणे अतिशय महत्वाचे आहे.

मराठी टीव्ही सिरियलमध्येही महाराष्ट्र फाऊंडेशनच्या पुरस्कार सोहळ्याचा उल्लेख पात्रांच्या तोंडी ऐकल्यावर प्रतिभा आणि सुनील देशमुखना हा सोहळा महाराष्ट्रात पूर्णपणे "मेन स्ट्रीम" झाल्यासारखे वाटले.

वसुमती देशपांडे , (TX)